☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 262 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 03 / 07 / 2025

# नांदेड पोलीसांचे वतीने आषाढी एकादशी निमित्ताने निर्भया वारीचे आयोजन..

आषाढी एकादशीचे निमित्त साधून दिनांक 04.07.2025 रोजी नांदेड पोलीस दलाकडून निर्भया वारीचे आयोजन करण्यात आले आहे.

नांदेड पोलीस दलाकडून **"मिशन निर्भया"** हा उपक्रम राबविण्यात येत असून या उपक्रमा अंतर्गत सायबर गुन्हे, वाहतूक नियम, विविध हेल्पलाईन्स, अंमली पदार्थ, कम्युनिटी पोलीसींग, महिला सुरक्षा व इतर विषयासंदर्भात नागरीकांमध्ये जनजागृती करण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमाचा भाग म्हणुन निर्भया वारीचे आयोजन करण्यात आले आहे. सदरच्या वारीचे दिनांक 04.07.2025 रोजी सकाळी 09.00 वाजता महात्मा फुले पुतळा आय.टी.आय.चौक येथे आयोजन करण्यात आले असून मान्यवरांच्या उपस्थीतीत वारीची सुरूवात करण्यात येणार आहे.

तरी सदर निर्भया वारीमध्ये नांदेड शहरातील शालेय विदयार्थी व नागरीकांनी जास्तीत जास्त प्रमाणात सहभागी होणेबाबत तसेच सर्व प्रकारच्या माध्यम प्रतिनिधीना उपस्थित राहणे बाबत नांदेड पोलीस दलातर्फे आवाहन करण्यात येत आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय,नांदेड